o/c

जा.क्र.का.15/बामुदत दर/परिपत्रक/ 804
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.20/08/2016.

**परिपत्रक :-**

विषय :- वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर व आर.सी.सी.व्यतिरिक्त अन्य प्रकारच्या बांधकामाचे मूल्यांकनाबाबत.

वार्षिक मूल्य दर तक्त्यात खुली जमीन, निवासी इमारत, कार्यालय / व्यावसायिक, दुकाने, औद्योगिक या वापराकरिता दर देणेत येतात. सदर दर हे जमिनीसह बांधकामाचे विक्री दर असतात. सदर दर सदनिका / कार्यालय / दुकाने इ.च्या नोंदणीकृत व्यवहारातील दरानुसार ठरविले जातात. त्यामुळे सदर दर हे आर.सी.सी.बांधकामासाठी असतात. वार्षिक मूल्य दर तक्त्यात स्वतंत्र दर दिले नसल्यास विविध वापराच्या इमारतीचे मूल्यांकन मुंबई शहर व उपनगरांकरिता सूचना क्र.7 आणि उर्वरीत महाराष्ट्रासाठी सूचना क्र.6 नुसार परिगणित करण्यात येते. सदर मूल्य दर परिगणित करण्यासाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांसोबतच्या परिशिष्ट 'ब' मध्ये बांधकाम वर्गीकरणानुसार नवीन बांधकामाचे दर देणेत येतात.

वार्षिक मूल्य दर तक्त्यामधील दर हे आर.सी.सी.प्रकारच्या बांधकामाचे असलेने अन्य प्रकारच्या जसे इतर पक्के, अर्ध पक्के, कच्चे बांधकाम याचे मूल्य परिगणित करताना मार्गदर्शक सूचनांचे परिशिष्ट 'ब' मधील दर तसेच मुंबई शहर व उपनगरांकरिता सूचना क्र.7 आणि उर्वरीत महाराष्ट्रासाठी सूचना क्र.6 नुसार करण्यात यावे.

उक्त परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे
२०/०८/१६

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.अपर मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
5) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
-/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

-/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

8) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
9) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

O/C
19/8/16